# श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

## वार्षिक सर्वसाधारण सभा

### * नोटीस *

(फक्त सभासदांकरिता)

सर्व सभासदांना कळविणेत येते कीं, आपल्या बँकेची सन २०२०-२१ ची **५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, गुरूवार दि.३०.०९.२०२१** रोजी **दुपारी २.०० वा. वारणानगर** येथे खालील विषयांवर विचार व निर्णय घेणेसाठी शासनाचे जा.क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२४/१३-स दिनांक : ३०, जुलै २०२१ चे आदेशानुसार Online पध्दतीने बोलविणेत आलेली असून सर्व सभासदांनी सदर सभेकरीता आपले ई-मेल व मोबाईल नंबर बँकेकडे सत्वर नोंद करावेत जेणेकरून ऑनलाईन हजर रहाणेसाठी लिंक पाठविणेत येईल. कोरोना महामारीमुळे शासनाचे सूचनेनुसार सदर सभा Online पध्दतीने घेणेत येणार असून प्रत्यक्ष हजर राहू नये याची नोंद घ्यावी.

### * सभेपुढील विषय *

१) दि.२६.०३.२०२१ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२) सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील बँकेच्या कामाकाजाचा अहवाल व बँकेचे वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रके मंजूर करणे.

३) संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सन २०२०-२०२१ सालाचे नफा विभागणीस अंतिम मंजूरी देणे व लाभांश जाहिर करणे.

४) सन २०२०-२०२१ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे. तसेच सन २०२१-२२ सालाकरिता खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

५) वैधानिक लेखापरिक्षक मे.काळे चौगुले ठिगळे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, इचलकरंजी यांचेकडून आलेला सन २०२०-२१ सालचा तपासणी अहवाल अवलोकनी घेणे व तो स्विकारणे तसेच सन २०१९-२० च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरूस्ती अहवालास मान्यता देणे.

६) बँकींग नियमन कायदा १९४९ मधील तरतुदीनुसार रिझर्व्ह बँकेच्या दि.RBI/2021-22/25 Reft.No.DoS.co.arg/sec 01/08.091.001/2021-22 Dt.27/04/2021 इ. रोजीच्या परिपत्रकान्वये संचालक मंडळाने सन २०२१-२२ सालाकरीता दोन वैधानिक लेखापरीक्षकांचा प्रस्ताव सादर केला त्यानुसार रिझर्व्ह बँकेने सन २०२१-२२ सालाकरीता केलेल्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या नियुक्तीस मान्यता देणे व त्यांचा मेहनताना ठरविणेचे.

७) संचालक मंडळाने कर्जातील व्याज, दंडव्याज तसेच एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेतंर्गत व इतर वसुली खर्चात दिलेल्या सवलतीस मान्यता देणे व दिर्घकाळ थकीत असलेली कर्जे बुडीत कर्ज निधी खाती निर्लेखित करणेस मंजूरी देणे.

८) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेच्या स्टाफींग पॅटर्नला मान्यता देणे.

९) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१०) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांचे अनुपस्थितीस मंजुरी देणे.

११) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेचा लाँग टर्म पर्सपेक्टीव्ह प्लॅनला मान्यता देणे.

१२) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्ती प्रस्तावास मंजुरी देणे.

१३) To discuss and decide on merger /amalgamation of the Hiriyur Urban Co-operative Bank Ltd, Hiriyur, Dist-Chitrarurga, Karnataka with our Bank.

१४) मा.अध्यक्षसाो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाचे आदेशावरून
राजेश पद्माकर सार्दळ,
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**स्थळ : वारणानगर.**
**दिनांक : १३.०९.२०२१**

**❖ सभासदांना नम्र सूचना :**

१) आवश्यक गणपुर्ती अभावी सभा तहकूब झालेस सदरची सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर होईल व त्या सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) सभासदांना काही माहिती हवी असलेस अगर काही सूचना करावयाच्या असतील तर त्या दिनांक.२४.०९.२०२१ पर्यंत हेड-ऑफीस, वारणानगर येथे पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.

३) पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रू.२०००/- चे भाग धारण करणे अनिवार्य आहे. तरी ज्या सभासदांनी भाग धारणा पूर्ण केली नाही त्यांनी कृपया याची पुर्तता करावी.

४) वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या सर्व शाखांमधून दि.१३.०९.२०२१ पासून उपलब्ध होईल. तसेच बँकेच्या www.waranabank.com या वेबसाईटवर उपलब्ध राहील.

५) **कोविड महामारीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शासनाच्या सुचनेनुसार सदर सभा ऑनलाईन पध्दतीने घेणेत येणार असून ऑनलाईन पध्दती द्वारेच सभेत सहभागी होता येईल याची नोंद घेवून सर्वांनी आपले ई-मेल व मोबाईल नंबर संलग्न शाखेकडे दि.२४.०९.२०२१ अखेर नोंद करावेत.**

६) **बँकेकडे नोंद असलेल्या मोबाईल नंबर वर सभेस Online पध्दतीने हजर राहणेकरीता दि.२८.०९.२०२१ व दि.२९.०९.२०२१ रोजी Link, Login ID व Password पाठविणेत येईल त्याद्वारे आपण सदर सभेस दि.३०.०९.२०२१ रोजी दुपारी १.३० नंतर Login होऊन आपली उपस्थिती नोंदवावी व त्या Link द्वारे विषयपत्रिकेवरील विषयाबाबत आपले मत नोंदवावे.**

# श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

## वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३०.०९.२०२१

**ऑनलाईन सभेमध्ये सहभागी होणेकरीता सभासदांनी द्यावयाची माहिती.**

१) सभासद नांव : ______________________________

२) सभासद नंबर : ______________________________

३) कस्टमर आयडी : ______________________________

४) अकौंट नंबर : ______________________________

५) पत्ता : ______________________________

६) मोबाईल नंबर : ______________________________

७) ई-मेलआयडी (असल्यास) : ______________________________

८) आधार नंबर : ______________________________

९) पॅन नंबर (असल्यास) : ______________________________

______________________

**सभासदाची सही**